
कॉंग्रेस महाराष्ट्रात सर्वात मोठा पक्ष पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com


रोहित-विराट सलामीला खेळणार? पान १० वर

वेर्णा, बुधवार, ५ जून २०२४ | पाने १० | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 12, Issue 276 | Verna, | facebook.com/dainikherald Wednesday, 5 June 2024 | Pages 10 | ₹ 4

## संपादकीय

जादू ओसरली –पान ४

## निवडक

### दिगंबर कामत यांना अटक करा : चोडणकर

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि.४ :** मडगावचे आमदार दिगंबर कामत हे बेकायदेशीरपणे व निवडणूक आचारसंहितेचा भंग करून मतमोजणी केंद्रात शिरले होते, असा दावा कॉंग्रेस पक्षाचे नेते गिरिश चोडणकर यांनी केला आहे. त्याबद्दल निवडणूक अधिकारिणी व पोलिसांनी आमदार दिगंबर कामत यांना अटक करावी, अशी आपली मागणी असल्याचे चोडणकर म्हणाले. यासंदर्भात विरियातो फर्नांडिस यांनी निवडणूक अधिकारी व पोलिस यंत्रणेकडे तक्रार केली असल्याचे चोडणकर म्हणाले.

### फेर मतमोजणीची मागणी फेटाळली

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि.४ :** मडगावातील एका मतपेटीत तांत्रिक बिघाड झाल्याचे व अन्य काही प्रकारांमुळे फेरमतमोजणी करावी, अशी मागणी भाजपतर्फे करण्यात आली. मात्र, दक्षिण गोवा जिल्हा निवडणूक अधिकारी अस्विन चंद्रू यांनी ही मागणी फेटाळून लावली.

### युपी, राजस्थानमध्ये उष्णतेची लाट

**नवी दिल्ली, दि. ४ :**

देशात भीषण उष्मा कायम आहे. हवामान खात्याने उत्तर प्रदेश, राजस्थान आणि झारखंडमध्ये चार दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. पंजाब–हरियाणा आणि दिल्लीत २ दिवस आणि बुधवारी जम्मू–काश्मीर, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश, ओडिशामध्ये उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे. सोमवारी पंजाब, हरियाणा, दिल्ली, राजस्थान आणि मध्य प्रदेशातील अनेक शहरांमध्ये तापमान ४३ अंश ते ४६ अंशांच्या दरम्यान नोंदवले गेले. कानपूर हे देशातील सर्वात उष्ण शहर होते. येथील तापमान ४६.८ अंशांवर नोंदवले गेले. त्याचवेळी हरियाणातील सिरसा येथे ४६.४ अंश आणि राजस्थानच्या गंगानगरमध्ये ४६.५ अंश तापमानाची नोंद झाली. यानंतर पंजाबच्या अमृतसरमध्ये ४५.९ अंश आणि दिल्लीच्या आयानगरमध्ये ४५.१ अंश तापमानाची नोंद झाली. ओडिशात या उन्हाळ्यात उष्माघातामुळे ३० जणांचा मृत्यू झाला आहे.

### वायुदलाचे विमान नाशिकात कोसळले

**नाशिक, दि. ४ :**

नाशिकच्या पिंपळगावजवळ शिरसगाव परिसरात वायूदलाचे विमान मंगळवारी कोसळले. विमान कोसळण्यामागील नेमकं कारण काय, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. वायूदलाच्या विमानाचा भीषण अपघात झाला. यात विमानाचे तुकडे–तुकडे झाले आणि त्याने पेट घेतला. दरम्यान, या दुर्घटनेत सुदैवाने पायलट बचावले आहेत. पायलट पॅराशुटच्या साहाय्याने विमानाबाहेर पडल्याने सुदैवाने जीवितहानी झालेली नाही. दरम्यान, या अपघाताचे नेमके कारण काय हे शोधण्याचा प्रयत्न सुरु आहे.

### हवामान

कमाल : ३० किमान : २४
आर्द्रता : ८९

### बाजार भाव

सोने : ₹ ७१,८५० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ९१,९०० (१ किलो)

### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ७३,९६१.३१ ↓ (७५.७१)
निफ्टी : २२,५३०.७० ↓ (४२.०५)

# उत्तरेत भाजप तर दक्षिणेत काँग्रेस!

## दक्षिण गोव्यात भाजपाच्या मनसुब्यांवर पाणी : उत्तरेत श्रीपाद नाईक यांचा विजयी षटकार

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. ४ : लोकसभा निवडणुकीत उत्तर गोव्यातून सहाव्यांदा निवडणूक लढविलेले केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी उत्तर गोव्यातून काँग्रेसच्या रमकांत खलप यांचा तब्बल १ लाख १६ हजार १५ एवढ्या विक्रमी मतांनी पराभव करीत मताधिक्क्यात विक्रम रचला. तर दक्षिण गोव्यात १३५३५ मतांची आघाडी घेत काँग्रेसच्या कॅप्टन विरियातो फर्नांडिस यांनी भाजपच्या उमेदवार पल्लवी धेंपे यांचा १३ हजार ५३५ मतांनी पराभव केला. दक्षिण गोव्यात भाजपसाठी हा मोठा धक्का असून 'सायलेंट' मतदारांनी आपली ताकद दाखवून दिली.**





उत्तरगोवा मतदारसंघातून श्रीपाद नाईक यांनी २ लाख ५७ हजार ३२६ मते मिळवत सलग सहाव्यांदा खासदार बनले. इंडी आघाडीचे ॲड. रमाकांत खलप यांना १ लाख ४१ हजार ३११ मते मिळाली. रिव्होल्युशनरी गोवन्स (आरजी) मनोज परब यांना ४५ हजार ६९३ मते मिळाली. बसपाच्या मिलन वायंगणकर यांनी १ हजार ६२५ मते मिळविली. अखिल भारतीय परिवार पार्टीच्या सखाराम नाईक यांना १ हजार ४१७ मते तर अपक्ष उमेदवार शकील शेख यांना ८०७ मते मिळाली. थॉमस फर्नांडिस (अपक्ष) यांना ७५९ तर विशाल नाईक (अपक्ष) यांना ७५२ मते मिळाले.

दक्षिण गोवा जिल्हा मतदारसंघातून इंडी आघाडीचे विरियातो फर्नांडिस यांना २ लाख, १७ हजार ८३६ मिळाली. पल्लवी धेंपे यांना २ लाख ४ हजार ३०१ मते पडली. आरजीचे रुबर्ट पेरेरा यांनी १८ हजार,८८५ मते मिळवली. नोटाला ४ हजार, ८३७ मते प्राप्त झाली. बहुजन समाज पार्टीच्या डॉ. स्वेता गावकर यांना १ हजार ५८१, अपक्ष दीपकुमार मापारी यांना १ हजार, ३१७, अपक्ष डॉ. कालिदास वायंगणकर ७२०, अपक्ष आलेक्सी फर्नांडिस ५४२, अपक्ष हरीश्चंद्र नाईक यांना ५०१ मते प्राप्त झाली. लोकसभा निवडणुकीत दक्षिण गोवा जिल्हा मतदारसंघातून राजकीय समीकरणे बदलून टाकणारा विजय असून, मडगावसहीत काही विधानसभा मतदारसंघांतील नेत्यांना इशारा देणारा हा विजय असल्याच्या प्रतिक्रिया नेत्यांनी व्यक्त केल्या आहेत.

## धार्मिक हस्तक्षेपामुळे दक्षिण गोव्यात पराभव

- भाजप नेत्यांचा पत्रकार परिषदेत दावा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ४ :** भारतीय जनता पक्षाच्या दक्षिण गोवा मतदारसंघातील पराभवासाठी धार्मिक हस्तक्षेप जबाबदार असल्याचा दावा पक्षाच्या नेत्यांनी मंगळवारी केला. येथे आयोजित पत्रकार परिषदेत भाजप प्रदेशाध्यक्ष तथा राज्यसभा खासदार सदानंद शेट तानावडे म्हणाले की, यंदाच्या निवडणुकीत दक्षिण गोव्यात आम्हाला दोन लाखांपेक्षा अधिक मते प्राप्त झाली आहेत. २०१४ मध्ये आम्ही दक्षिण गोवा काबीज केला होता पण दोन लाखांपेक्षा कमी मते मिळाली होती. २०१९ मध्ये सुद्धा १.९९ लाखांच्या आसपास मते भाजपच्या पारड्यात पडली होती.

> **दक्षिण गोव्यात आम्हाला विजयाची आशा होती, पण तिथे आमचा पराभव झाला. आम्ही आमचा पराभव मान्य करत आहोत, पण काही मते धार्मिक हस्तक्षेपामुळे आम्हाला मिळू शकली नाही, असे आढळून आले आहे. आम्हाला मिळालेल्या कौलाने काही गोष्टी स्पष्ट झाल्या आहेत.**
> **–सदानंद शेट तानावडे,** भाजप प्रदेशाध्यक्ष

मुख्यमंत्री प्रमोद सावंत म्हणाले की, दक्षिण गोव्यात आम्हाला पराभवाचा सामना करावा लागला आहे, आम्ही हा निकाल मान्य करत आहोत. पान २ ▶

> दक्षिण गोव्यातील मतदारांनी दिलेला निकाल आपण नम्रपणे स्वीकारते. विजय मिळवलेले विरियातो फर्नांडिस यांचे अभिनंदन. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली लोकसभा निवडणुकीत बहुमत मिळवलेल्या भाजप व राष्ट्रीय आघाडीचे आपण अभिनंदन. अगदी कमी मतांच्या फरकाने आपल्याला पराभव स्वीकारावा लागला तरी यापुढे ही आपण करीत आलेल्या समाजसेवेतून आपण लोकांची सेवा करीत राहणार आहे. सर्वांनी एकत्र येऊन दक्षिण गोव्याला चांगले बनवण्यासाठी कार्यरत राहू या, सर्वांना देव बरें करूं, जय हिंद.
> **पल्लवी धेंपे,** भाजपच्या पराभूत उमेदवार.

### उत्तर गोवा मतदारसंघ

श्रीपाद नाईक (भाजप) : २ लाख ५७ हजार ३२६ मते (विजयी)

रमाकांत खलप (काँग्रेस) : १ लाख ४१ हजार ३११ मते (पराभूत)

मनोज परब (आरजी) : ४५ हजार ६९३ मते (पराभूत)

> आपल्याला मिळालेला विजय हा मतदारांचा विजय असून, आपल्यावर विश्वास ठेवून मतदान केलेले शेतकरी, मच्छीमार, कष्टकरी व सर्वसामान्य जनतेचा हा विजय आहे. इंडी आघाडीतील घटक पक्षातील गोवा फॉरवर्डचे सर्वेसर्वा तथा आमदार विजय सरदेसाई, आम आदमी पार्टीचे आमदार व्हेंझी व्हिएगस, आमदार क्रुझ सिल्वा व इतर नेते, काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष अमित पाटकर व इतर नेत्यांच्या सहकार्यामुळे विजय मिळवणे शक्य झाला.
> **-- विरियातो फर्नांडिस, काँग्रेसचे** विजयी उमेदवार.

### खलप यांना मांद्रे, पेडणे मतदारसंघातही धक्का

ॲड. खलप यांना मांद्रे व पेडणे मतदारसंघामध्ये त्यांच्या होम गाऊंडवर मोठे मताधिक्य अपेक्षित होते. परंतु त्यांचा भ्रमनिराश झाला. पेडणे मतदारसंघातून खलप यांना ६२६९ मते तर मांद्रे मतदारसंघातून ९३६३ मते मिळाली. तर दुसरीकडे श्रीपाद नाईक यांना दोन्ही मतदारसंघातून २९ हजारांचे मताधिक्य मिळाले.



> श्रीपाद नाईक यांच्या विजयाबद्दल त्यांचे अभिनंदन. भाऊंना मोठ्या मताधिक्याने विजय मिळाला आहे, तो मी मान्य करतो. राज्य आणि देशाच्या विकासासाठी त्यांनी कार्यरत राहावे, ही अपेक्षा. आता निवडणुका संपल्याने आमच्यातील नाटक संपुष्टात आले आहे. आता मैत्री कायम राहणार आहे.
> **–रमाकांत खलप,** काँग्रेसचे उमेदवार.



> उत्तर गोव्यातील जनता आणि पक्ष कार्यकर्त्यांचा मी आभारी आहे. त्यांच्याच जोरावर मला गेल्या निवडणुकांपेक्षा अधिक असे मताधिक्य मिळवता आले आहे. माझ्या विजयाचे श्रेय सर्वांनाच जाते. गेल्या कार्यकाळाप्रमाणे आताही मी विकासकामांवर भर देणार आहे.
> **–श्रीपाद नाईक,** उत्तर गोव्यातील विजयी उमेदवार.

> डबल इंजिनचे सरकार पुन्हा एकदा सत्तेत येणार आहे. जनतेने निवडणुकांच्या माध्यमातून दिलेली प्रतिक्रिया आम्ही मान्य करत आहोत. उत्तर गोव्यातील निकालासाठी आम्ही जनतेचे आभारी आहोत. उत्तर गोवा मतदारसंघात भाजपला पाठिंबा दिल्याबद्दल मी संपूर्ण गोमंतकीय जनतेचे आभार मानतो.
> **–प्रमोद सावंत,** मुख्यमंत्री.

### दक्षिण गोवा मतदारसंघ

विरियातो फर्नांडिस (काँग्रेस) : २ लाख १७ हजार ८३६ मते (विजयी)

पल्लवी धेंपे (भाजप) : २ लाख,४ हजार ३०१ मते (पराभूत)

रुबर्ट पेरेरा (आरजी) : १८ हजार, ८८५ मते (पराभूत)



# स्वबळावर सत्ता स्थापनेचे स्वप्न भंगले

## भाजपला २४१ जागा : इंडिया आघाडीची जोरदार मुसंडी

**नवी दिल्ली, दि. ४ :**

अठराव्या लोकसभेचे चित्र स्पष्ट झाले आहे. अब की बार ४०० पार असा नारा देत निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आणि भाजपचे स्वबळावर सत्ता स्थापन करण्याचे स्वप्न भंगले आहे. आतापर्यंत आलेल्या निकालांमध्ये भाजपला २४१ जागांवर आघाडी मिळाली आहे. तर भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीए सुमारे २९४ जागांवर आघाडीवर आहे. दुसरीकडे या निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखालील इंडिया आघाडीनेही जोरदार मुसंडी मारली आहे. इंडिया आघाडीतील सर्व पक्षांनी मिळून २३२ जागांवर आघाडी घेतली आहे. त्यामुळे मागच्या दोन निवडणुकांत स्वबळावर बहुमत मिळवून सरकार स्थापन करणाऱ्या भाजपाला यावेळी मित्रपक्षांच्या मदतीने सरकार चालवण्यासाठी मित्रपक्षांची मदत घ्यावी लागणार आहे.

मंगळवारी सकाळी मतमोजणीला सुरुवात झाल्यापासून भाजपा आणि एनडीए पीछाडीवर पडत गेली. तर काँग्रेस आणि इंडिया आघाडीमधील घटक पक्षांनी अनपेक्षित मुसंडी मारली. भाजपाला सर्वाधिक अपेक्षा असलेल्या उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान, पश्चिम बंगाल आदी राज्यांमध्ये मोठ्या नुकसानाचा सामना करावा लागला. त्यामुळे भाजपा २७२ या बहुमताच्या आकड्याखाली घसरला. विशेषत: उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्षाने भाजपाला मोठा धक्का दिला.

दुसरीकडे, काँग्रेसने राजस्थान, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, केरळ, तामिळनाडू, हरियाणा आदी राज्यांमध्ये बऱ्यापैकी यश मिळवले.

काँग्रेसने ९९ जागांवर आघाडी घेतली आहे. तसेच इंडिया आघाडीतील मित्र पक्ष असलेल्या समाजवादी पक्षाने ३५ हून अधिक जागांवर विजय मिळवला. त्याबरोबरच पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसने २९ आणि तामिळनाडूमध्ये द्रमुक पक्षाने २१ जागा मिळवून मोठे यश मिळवले.

भाजपा २४१ जागांवर आघाडी घेत सर्वांत मोठा पक्ष ठरला आहे. मात्र आता भाजपाला नवे सरकार स्थापन करण्यासाठी मित्रपक्षांची मदत घ्यावी लागणार आहे. तसेच नवे सरकार स्थापन करण्यामध्ये एनडीएमधील जनता दल युनायटेड आणि आंध्र प्रदेशमधील तेलुगू देसम पक्षांची साथ भाजपाला महत्त्वाची ठरणार आहे.

> **जनतेने सलग तिसऱ्यांदा एनडीएवर विश्वास दाखवला आहे. भारताच्या इतिहासातील ही एक ऐतिहासिक कामगिरी आहे. या आपुलकीसाठी मी जनता जनार्दन यांना प्रणाम करतो आणि जनतेच्या आशा–आकांक्षा पूर्ण करण्यासाठी गेल्या दशकभरात केलेले चांगले काम आम्ही सुरूच ठेवणार.**
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान.**

> **मी जनतेचा, इंडिया आघाडीतील मित्रपक्षांचा, नेता आणि कार्यकर्त्यांचे मनापासून आभार मानतो. तुम्ही संविधानाला सुरक्षित ठेवण्यासाठी पहिले आणि सर्वांत मोठे पाऊल उचलले आहे. आम्ही आघाडीतील उमेदवारांचा आदर केला आणि जिथे लढलो, तिथे एकजुटीने लढलो. आम्ही अगोदर सांगितल्याप्रमाणे आम्ही आमच्या इंडिया आघाडीमधील सहकाऱ्यांसोबत बैठक घेणार आहोत. ही बैठक उद्या बुधवारी होईल. आम्ही आमच्या घटक पक्षांचा आदर करतो, त्यामुळे त्यांची मते घेतल्याशिवाय आम्ही कोणतीही घोषणा करणार नाही. पुढील निर्णय उद्या इंडिया आघाडीची बैठकीत होईल.**
> **– राहुल गांधी, काँग्रेसचे नेते.**

- कांग्रा मतदारसंघातून काँग्रेसचे आनंद शर्मा पराभूत, भाजपच्या राजीव भारद्वाज यांचा २५१,८९५ मतांनी विजय.
- हासन मतदारसंघातून प्रज्वल रेवण्णा यांचा ४२,६४९ मतांनी पराभव
- अमेठीत स्मृती इराणी यांचा पराभव, काँग्रेसचे किशोरी लाल शर्मा विजयी.
- गुणा मतदारसंघातून ज्योतिरादित्य शिंदे ५.४० लाख मतांनी विजयी
- भटिंडातून शिरोमणी अकाली दलाच्या हरसिमरत कौर बादल विजयी.
- गुजरातचे भाजप प्रदेशाध्यक्ष सी. आर. पाटील नवसारी मतदारसंघातून
- नागपूरमधून नितीन गडकरी तिसऱ्यांदा विजयी झाले आहेत.
- मैनपुरी मतदारसंघातून अखिलेश यादव यांच्या पत्नी डिंपल यादव २.२१ लाख मतांनी विजयी.
- रायबरेलीतून राहुल गांधी ३.९० लाख मतांनी विजयी. वजयी.

पान २ ▶

# महाविकास आघाडीचा महाराष्ट्रात जोर

- ३० जागांवर आघाडी
- महायुतीला धक्का

**मुंबई, दि. ४ :**

लोकसभा निवडणुकीच्या निकालाचे चित्र स्पष्ट झाले असून महाराष्ट्र राज्यात महाविकास आघाडीने जोरदार मुसंडी मारत ३० जागांवर आघाडी घेतली आहे. तर दुसरीकडे महायुतीला मात्र १७ जागांवर समाधान मानावे लागले असून एका अपक्षाने बाजी मारली. यात काँग्रेसने १३ जागांवर मुसंडी मारली आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने ९ जागांवर तर शरद पवार गटाने ७ जागांवर बाजी मारली आहे. भाजपला १० जागा तर एकनाथ शिंदेच्या शिवसेनेचे केवळ ७ जागा तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला १ जागा व अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे.

महाराष्ट्र राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडल्यानंतर पहिल्यांदाच मोठी निवडणक होत असल्याने सर्वांचे लक्ष या निकालांकडे पान २ ▶

### विजयी झालेले उमेदवार :

१) दक्षिण मुंबई – अरविंद सावंत – ठाकरे गट
२) दक्षिण मध्य मुंबई – अनिल देसाई – ठाकरे गट
३) उत्तर पश्चिम मुंबई – रविंद्र वायकर – शिवसेना शिंदे गट
४) बुलढाणा – प्रतापराव जाधव – शिंदे गट
५) ठाणे – नरेश म्हस्के – शिंदे गट
६) कल्याण – श्रीकांत शिंदे – शिंदे गट
७) नाशिक – राजाभाऊ वाजे – ठाकरे गट
८) औरंगाबाद – संदीपान घुमरे – शिंदे गट
९) हिंगोली – नागेश पाटील – ठाकरे गट
१०) यवतमाळ – संजय देशमुख – ठाकरे गट
११) हातकणंगले – धैर्यशील माने – शिंदे गट
१२) मावळ – श्रीरंग बारणे – शिंदे गट
१३) शिर्डी – भाऊसाहेब वाकचौरे – ठाकरे गट
१४) बारामती – सुप्रिया सुळें – शरद पवार गट पान २ ▶